RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष ९, अंक १५(२)] मंगळवार, फेब्रुवारी ७, २०२३/माघ १८, शके १९४४ [पृष्ठे ३, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक २७**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२, दिनांक ७ फेब्रुवारी २०२३.

**अधिसूचना**

**महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३.**

क्रमांक कृबास-०४२२/प्र.क्र.१९४/२१-स.— महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन ( विकास व विनियमन ) अधिनियम, १९६३ ( १९६४ चा महा. २० ) याच्या कलम ६० च्या पोट-कलम ( १ ) व पोट-कलम ( २ ) च्या खंड ( ड ) व ( यु ) याद्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा आणि त्याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे हरकती व सूचना विचारात घेतल्यानंतर, **महाराष्ट्र शासन राजपत्र**, असाधारण, भाग-४ब, दिनांक १६ जानेवारी, २०२३ यामध्ये प्रसिद्ध केलेली शासकीय अधिसूचना, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, क्रमांक कृबास-०४२२/प्र.क्र.१९४/२१स, दिनांक १६ जानेवारी, २०२३ यास अनुसरून महाराष्ट्र कृषी उत्पन्न बाजार समित्या ( समितीची निवडणूक ) नियम, २०१७ यात आणखी सुधारणा करण्यासाठी पुढील नियम करीत आहे :—

१. या नियमांस, महाराष्ट्र कृषी उत्पन्न बाजार समित्या ( समितीची निवडणूक ) ( पहिली सुधारणा ) नियम, २०२३, असे म्हणावे.

२. मुख्य नियमाच्या नियम ७ मध्ये, पोट-नियम ( ४ ) नंतर, पुढील पोट-नियम ( ५ ) समाविष्ट करण्यात येईल :—

"( ५ ) कृषी पतसंस्था, बहुउद्देशीय सहकारी संस्था व ग्रामपंचायती यांच्या नव्याने निवडून आलेल्या समितीच्या बाबतीत किंवा जेव्हा कृषी पतसंस्था, बहुउद्देशीय सहकारी संस्था व ग्रामपंचायती यांनी व्यवस्थापन समितीचे सदस्य स्वीकृत केले असेल त्याबाबतीत, पोट-नियम ( ३ ) अन्वये प्रसिद्ध केलेल्या मतदारांच्या अंतिम यादीमध्ये ज्या व्यक्तीचे नाव समाविष्ट नाही अशा कोणत्याही व्यक्तीस, कोणत्याही वेळी परंतु, नामनिर्देशन करण्याच्या शेवटच्या दिनांकापूर्वी पाच कामकाजाच्या दिवसांच्या आत, जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याकडे अर्ज करता येईल; आणि जिल्हा निवडणूक अधिकारी किंवा त्याने प्राधिकृत केलेली

व्यक्ती, चौकशी करील, जर जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याने प्राधिकृत केलेल्या व्यक्तीने चौकशी केली असेल त्याबाबतीत, ती व्यक्ती, चौकशीचा अहवाल जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यास सादर करील. त्यानंतर, जिल्हा निवडणूक अधिकारी, अंतिम मतदारयादीमध्ये त्यास योग्य वाटेल असे आवश्यक ते बदल करील.”.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**डॉ. सुग्रिव संभाजी धपाटे,**
शासनाचे सहसचिव.

## CO-OPERATION, MARKETING AND TEXTILES DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya,
Mumbai 400 032, dated the 7th February, 2023.

*NOTIFICATION*

Maharashtra Agricultural Produce Marketing (Development and Regulation) Act, 1963.

No.KBS-0422/C.R.194/21-C.- In exercise of the powers conferred by sub-section (*1*) and clauses *(d)* and *(u)* of sub-section (*2*) of section 60 of the Maharashtra Agricultural Produce Marketing (Development and Regulation) Act, 1963 (Mah. XX of 1964), and of all other powers enabling in that behalf, the Government of Maharashtra hereby, after considering objection and suggestions, pursuant to the Government Notification, Co-operation, Marketing and Textiles Department, No. KBS-0422/C.R.194/21-C, dated the 16th January 2023, published in the *Maharashtra Government Gazette*, Extraordinary, Part IV-B, dated the 16th January 2023, makes the following rules further to amend to the Maharashtra Agricultural Produce Market Committee (Election to Committee) Rules, 2017, namely :—

1. These rules may be called the Maharashtra Agricultural Produce Market Committee (Election to Committee) (First Amendment) Rules, 2023.

2. In rule 7 of the principal rules, after sub-rule *(4)*, the following sub-rule *(5)* shall be inserted, namely :—

"(5) In case of newly elected committee of the Agricultural Credit Societies, Multi-purpose Co-operative Societies and Village Panchayats or where due to co-option of members of the Managing Committee by the Agricultural Credit Societies, Multi-purpose Co-operative Societies and Village Panchayats, any person whose name is not entered in the final list of voters as published under sub-rule *(3)*, may at any time but not later than five working days before the last date of making nominations, apply to the District Election Officer; and the District Election Officer or the person authorized by him, shall conduct an inquiry, in case the inquiry is conducted by the person authorized by the District Election Officer in this behalf, he shall submit the report of inquiry to the District Election Officer. Thereafter, the District Election Officer, as he deems fit, may make necessary changes in the final voter list."

By order and in the name of the Governor of Maharashtra,

Dr. SUGRIV SAMBHAJI DHAPATE,
Joint Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.